**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : ०८/०३/२०२३

प्रति,
मा. --------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या **स्थायी समिती सभा क्र -१३ सोमवार दि. १३/०३/२०२३ रोजी सकाळी ११.३०वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**सोमवार दिनांक - १३ /०३/२०२३ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १७० | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार सन २०२२-२०२३चे सुधारित व सन २०२३-२०२४चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत. |

सही /-
नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १३

विषय क्रमांक-१७० सोमवार दिनांक-१३/०३/२०२३

**प्रस्तावाचा विषयः-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूरः-** अहमदनगर महानगरपालिका अर्थ विभाग जा.नं.१३०६ दि.०८/०३/२०२३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रकाचा विषय मा.स्थायी समिती सभेत घेणे यावा. ही विनंती. येणेप्रमाणे मा.आयुक्त साहेब यांचे पत्र

यावर मा.नगरसचिव श्री.शहाजान तडवी यांचा अभिप्राय की, श्री.सुधाकर भुसारे, स्वीय सहाय्यक मा.सभापती साहेब यांचे निदर्शनास आणून दयावे व तारीख व वेळ घ्यावी.

मा.सभापती साहेब यांचा अभिप्राय की, अर्थसंकल्पीय सभा दिनांक-१३/०३/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. आयोजीत करण्यात यावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--***--

**चर्चा :-**

मा.आयुक्तसाहेब अहमदनगर महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मा.स्थायी समितीस सादर करतील.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन-२०२३-२०२४ चे १२४० कोटी मुळ अंदाजपत्रक दि.१३/०३/२०२३ रोजी मा.स्थायी समिती सभापती मा.श्री.गणेश (उमेश) कवडे यांचेकडे मा.आयुक्त श्री. पंकज जावळे यांनी सादर केले.

**मा.आयुक्त, डॉ.पंकज जावळे साहेब अर्थसंकल्पावरील आपले मनोगत व्यक्त करतील.**

मा.आयुक्त साहेबः-महानगरपालिका अंदाजपत्रकात महसुली उत्पन्न रु.४३२ कोटी २१ लाख, भांडवली जमा रु.७४० कोटी ०५ लाख अंदाजित आहे. महसुली उत्पन्नात संकलीत करापोटी रु. ८० कोटी ८० लाख, संकलीत करावर आधारीत करापोटी ७९ कोटी ७० लाख, जी.एस.टी अनुदान १२० कोटी ६० लाख व इतर महसुली अनुदान रु.१७ कोटी ८५ लाख, गाळा भाडे ३ कोटी ६० लाख, पाणीपट्टी ४२ कोटी ६१ लाख, मिटरद्वारे पाणी पुरवठापोटी २० कोटी, संकीर्णे ४२ कोटी ३९ लाख इ. महत्वाच्या आहेत. तसेच भांडवली कामांवर अनुदान, कर्ज व मनपा हिस्सा धरुन रु. ८१८ कोटी ३७ लाख अंदाजित जमा होणार आहेत.

खर्च बाजूस वेतन, भत्ते व मानधनावर १३८ कोटी ९५ लाख, पेन्शन ४७ कोटी ४४ लाख पाणी पुरवठा विज बिल ३५ कोटी, स्ट्रीट लाईट विज बिल ५ कोटी ५० लाख, शिक्षण विभाग वेतन हिस्सा व इतर खर्च हिस्सा ५ कोटी ७२ लाख, महिला व बाल कल्याण योजना ३ कोटी ३४ लाख, अपंग पुनर्वसन योजना ३ कोटी ३४ लाख, मागासवर्गीय कल्याणकारी योजना १० कोटी ०४ लाख, मा.सदस्य मानधन १ कोटी ५० लाख, औषधे व उपकरणे १ कोटी, मा.सदस्य प्रभाग स्वेच्छानिधी ८ कोटी ६४ लाख, कचरा संकलन व वाहतूक १ कोटी ५० लाख, पाणी पुरवठा साहित्य खरेदी व दुरुस्ती १ कोटी, टँकरद्वारे पाणी पुरवठा व तुरटी, ब्लिचिंग पावडर खरेदी २ कोटी २० लाख, अशुध्द पाणी आकार २ कोटी, विविध वाहने खरेदी १ कोटी ५०, नविन रस्ते १३ कोटी, रस्ते दुरुस्ती ४ कोटी २५ लाख, इमारत दुरुस्ती १ कोटी २५ लाख, शहरातील ओढ नाले साफसफाई ४५ लाख, आपत्कालीन व्यवस्थापन ५० लाख, कोडवाड्यावरील खर्च २६ लाख, वृक्षारोपन तदनुषंगिक खर्च १ कोटी २५ लाख, हिवताप प्रतिबंधक योजना ४० लाख, कचरा डेपो सुधारणा व प्रकल्प उभारणी २१ लाख, मोकाट कुत्री व जनावरे बंदोबस्त १ कोटी ५५ लाख, मालमत्ता सर्वेक्षण २० कोटी, मृत जनावरे विल्हेवाट प्रकल्प २० लाख, पुतळे बसविणे २ कोटी १० लाख, भविष्य निर्वाह निधी तूट ५ कोटी, बेवारस प्रेत विल्हेवाट ७५ लाख, उद्यान दुरुस्ती ७५ लाख यासह इतर बाबींबर खर्च अपेक्षीत आहे.

शहरात चांगल्या दर्जाचे रस्ते तयार करण्यासाठी नविन रस्ते व रस्ते दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच मुलभूत आरोग्य, विज, पाणी या चांगल्या दर्जाच्या सेवा देण्यासाठी महानगरपालिका कटिबध्द आहे. शासनाकडून प्राप्त होणा-या विविध कामांसाठीच्या निधीतील जसे मुलभूत सुविधा विकास योजना, दलितेतर वस्ती सुधारणा योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना, अल्पसंख्यांक विकास निधी, १५ वा वित्त आयोग, सर्वासाठी घरे निधी, पाणी पुरवठा निधी, आमदार निधी, खासदार निधी इत्यादीमधील कामे पूर्णत्वास नेणे व नविन कामांसाठी शासन स्तरावर प्रयत्न करुन जास्तीस्त निधी मिळवून शहराचा चांगल्या प्रकारे विकास करणे.त्याचप्रमाणे शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण करुन घरपट्टी आकारणी करुन उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.त्याचप्रमाणे महानगरपालिकांच्या जागांचा विकास करुन त्या माध्यमातून महसूल वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. शहरातील अपूर्ण अवस्थेतील योजना व विकास कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येऊन शहराचा विकास करणेसाठी महानगरपालिका कटिबध्द आहे.

यावेळी आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे, अतिरिक्त आयुक्त डॉ.श्री.प्रदीप पठारे, उपायुक्त श्री.यशवंत डांगे, मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश मोरे, मुख्यलेखापरीक्षक श्री.विशाल पवार, लेखा विभागाचे श्री.अनिल लोंढे आदींसह स्थायी समिती सदस्य व खातेप्रमुख उपस्थित होते.

**या नंतर मा.सभापती आपले मनोगत व्यक्त करतील.**

मा.सभापती साहेबः- मा.आयुक्त साहेब यांचा प्रशासकिय सेवेतील प्रदिर्घ अनुभव असून या अनुभवाचा शहर विकासाच्या बाबतीत ते सकारात्मक निर्णय घेतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच मा.आयुक्त साहेबांना मी विनंती करतो की, त्यांनी या सभेमध्ये संपुर्ण अंर्थसंकल्पीय कामकाजामध्ये सहभाग घेवून सभा संपेपर्यत उपस्थित राहून आम्हाला मार्गदर्शन करावे.

उपस्थित सर्व मा.स्थायी समिती सदस्य, महानगरपालिकेचे सर्व विभाग प्रमुख व अधिकारी, पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.नुकतीच मा.स्थायी समितीच्या सभापतीपदी माझी बिनविरोध निवड झाली आहे. प्रशासनाने मा.स्थायी समिती मध्ये अर्थसंकल्प सादर करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला. त्यानुसार आजची अर्थसंकल्पावरील सभा आयोजीत करण्यात आलेली आहे. प्रत्येक संस्थेमध्ये अर्थसंकल्प अत्यंत महात्वाचा भाग असून या माध्यमातुन शहराच्या प्रगतीचा आलेख आपल्याला उंचावण्याची संधी आहे. नुकत्याच झालेल्या निवडीने माझ्यावर शहर विकासाची मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे.

सर्व स्थायी समिती सदस्य व अधिकारी यांच्या सहकार्यातुन आपण सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाचे स्वागत करून, अर्थसंकल्पामध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या योजना तसेच शहराच्या सर्वांगीन विकास करण्याकरीता आपण मला सहकार्य कराल अशी खात्री बाळगतो.

मा.श्री.पाअुलबुधे विनीतः- मा.सभापती साहेब आज सादर झालेल्या अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्याकरिता सभा तहकुब करण्यात यावी व बुधवार दि.१५/०३/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. सभा घेण्यात यावी.

मा.श्री.बारस्कर संपतः- मा.श्री.पाअुलबुधे विनीत साहेब यांनी मांडलेल्या सुचनेस अनुमोदन देत आहे.

मा.सभापती साहेबः- महानगरपलिकेचे सन २०२३-२४ या वर्षाचे अंदाजपत्रक आपल्या अहमदनगर महानगरपालिकेचे आयुक्त साहेब यांनी सादर केले आहे. अंदाजपत्रकाची माहिती दिली आहे. त्यावर मा.श्री.पाअुलबुधे विनीत व सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे चर्चा करण्यासाठी बुधवार दि.१५/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा.सभा पुढे सुरू होईल. सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांनी सभे करीता आवश्यक त्या माहितीसह सभेस उपस्थित रहावे.

*-*-*-*-*-

**सोमवार दि. १३/०३/२०२३ रोजी तहकुब सभा आज बुधवार दिनांक १५/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा.सुरू झाली.**

**चर्चाः-**

मा.सभापती साहेबः- तहकुब सभा सुरु करण्यात यावी, सर्व खाते प्रमुख शाखा प्रमुख उपस्थित आहेत का? उपस्थित यांची नावे घेण्यात यावी व त्यांचेवर काय कारवाई करणार.

मा.सभापती साहेबः- भोंग्याबाबत काय झाले.

शहर अभियंता श्री.निंबाळकर साहेबः- सुचविण्यात आलेल्या जागेची पहाणी केली. त्याठिकाणी फौंडेशन करावे लागेल.

मा.सभापती साहेबः- सन २०२३-२३ च्या अर्थसंकल्पानुसार प्रत्येक लेखाशिर्ष निहाय वाचन करण्यात यावे.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे साहेब यांनी लेखाशिर्षानुसार वाचनास सुरूवात केली. त्या मध्ये त्यांनी महसुली जमा, भांडवली जमा, भांडवली खर्च तसेच भांडवली खर्च मधील अंदाजीत तरतुदी तसेच दुबेरजी जमा व खर्च अशा पध्दतीने आपले अंदाजपत्रक तयार होते. यामध्ये महसुली उत्पन्नात सर्वात जास्त व महत्वाचा भाग म्हणजे करापासुन मिळणारे उत्पन्न आहे.तर भांडवली जमेमध्ये शासनाकडून तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विविध योजनासाठी निधी प्राप्त होत असतो. यामध्ये काही योजनामध्ये आपल्याला महानगरपालिकेचा हिस्सा जमा कराव लागतो.सन २०२३-२०२४ मध्ये अमृत-२/ नगरोत्थान अंतर्गत आपल्याला पाणी पुरवठा योजना व भुयारी गटर योजनेमध्ये निधी प्राप्त होणार आहे. मनपाचा आर्थिक परिस्थितीचा विचार करता. यामध्ये हिस्सा भरणेकरीता निधी उपलब्ध होणार नाही. सबब या वर्षी १०० कोटी रक्कमेच्या कर्जाचे नियोजन आहे. एकुण या अर्थ संकल्पामध्ये १२३९ कोटी खर्च अंदाजे केला आहे. पृष्ट क्र.३ वर TAX, वसुली विभाग, डिमांडपासुन सुरु करु.

श्री.जोशीः- वसुली मध्ये एकुण ५६ कोटी जमा झाले आहे. तसेच सन २०२२-२३ चे व सन २०२३-२४ करीता ८० कोटी केले आहे.

मा.उपायुक्त श्री.कुरे :- ५६ कोटी मधुन जमा किती झाले. १७.८१ जमा झाले.

मा.श्री.संपत बारस्करः- २० कोटी जमा झाले आहे. यामध्ये ८० कोटी का केले.

मा.श्री.संपत बारस्कर:- प्रत्यक्ष वसुली काम झाले पाहीजे. २० कोटी जमा झाले.

मा.श्री.पाअुलबुधे विनीत:- ५६ कोटी वसुल आहे. तर ८० कोटी का केले.

मुल्यनिर्धारण कर संकलन अधिकारी श्री.बांगर साहेब:- २० कोटी जमामध्ये एखादे कोर्ट केस प्रकरणे आहेत. त्यामुळे वसुली झाली नाही. आज अखेर ३८ कोटी जमा आहे. मार्च अखेरी पर्यंत ४० कोटी वसुली होईल.

मा.श्री.संपत बारस्कर:- जर एखाद्या व्यक्तीने चेक दिला आणि तो बाऊस झाला तर काय

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- तो चेक जर बाऊस झाला तर परत डिमांड वाढ़ते.

मा.सभापती साहेब:- मोठा चेक असेल आणि तो बाऊस झालातर काय?

मा.श्री.संपत बारस्कर:- किती लोक चेक बाऊन्स करतात. आता पर्यंत किती लोकांवर केस केल्या. त्याची माहीती द्या.

मा.सभापती साहेब:- त्यांच्यावर केस दाखल करा.

मा.उपायुक्त श्री.कुरे:- ८० कोटी जास्त वाटतात. एवढी रक्कम जमा होणार नाही.काही बजेटवर जादा तरतुद दाखवली आहे.

मा.सभापती साहेब:- जमा बाजु दिलेला चेक बाउन्स झालातर त्यावर कारवाई करावी.

सहाय्यक श्री.बांगर:- रिव्हीजन झाल्यावर जमा बाजू वाढ़ेल.

मा.शेख नजीर अहमद अ.रज्जाक:- यामध्ये ८० कोटीचा आकडा कसा काढला त्याची माहिती द्या.

सहा.मु.निर्धा.कर संकलन अधिकारी श्री.बांगर:- शहरामध्ये १ लाख २२ हजार प्रोपर्ट्या आहेत. २० वर्षाच्या नुसार १ लाख ७५ हजार प्रोपर्ट्या होतील त्यानुसार ८० कोटीचे उत्पन्न होईल.

मा.सभापती साहेब:- शहरातील पत्राशेड वसुली भाडे आकारणी करावी. शहरातील सर्व शेडचे रिव्हीजन केले का?

श्री.जोशी:- पत्राशेडचे रिव्हीजन केले आहे.

मा.शेख नजीर अहमद अ.रज्जाक:- पारशाखुंट मस्जित समोरील मालमत्ता आहे. त्यावर थकबाकी आहे.

मा.अति.आयुक्त श्री.पठारे साहेब:- यापुर्वी पत्राशेडवर आकारणी केली होती.

मा.सभापती साहेब:- शहरातील खाजगी जागेतील पत्रा शेडवर आकारणी करा.

मा.सभापती साहेबः- "मालमत्ता नांव नोंदणी फि" या लेखाशिर्षा मध्ये नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून होणार आसल्याने रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

मा.उपायुक्त श्री.कुरे :- शहरामध्ये खाजगी जागा व मनपा जागेमध्ये शेड बाधंतात. त्यावर अतिक्रमण विभाग कारवाई करत नाही. त्यामुळे वाहतुकीस अडथळा येतो. याकरिता नगररचनाकार व अतिक्रमण विभाग यांनी शेडची पहाणीकरुन आकारणी करा नाहीतर कारवाई करा. आज चारठाणकर साहेब नाहीत तर उत्तर कोण देणार?

मा.श्री.संपत बारस्करः- नियमात पत्राशेड बांधावे. नागरिक रस्त्यावर शेड बांधतात.

मा.श्री.पाअुलबुधे विनीतः- महानगरपालिका हद्दीतील पाईपलाईन रस्त्यावर किती शेड आहेत व किती फुट रस्ता आहे. त्या ठिकाणी सर्व अतिक्रमण आहे.

उप.अभियंता श्री.सातपुतेः- ६५ फुट रस्ता आहे. त्याठिकाणी १०० ते १६५ पत्राशेड आहेत.

मा.श्री.पाअुलबुधे विनीतः- महानगरपालिकेचे वसुली कर्मचारी काम करीत नाही. बरेच कर्मचारी हे प्लॉटींगचा व्यवसाय करतात.

मा.सौ.सुनिता कोतकरः- महानगरपालिकेमध्ये वसुली वसुल होत नाही. तसेच नवीन बांधकामाची आकारणी होत नाही.

मा.सभापती साहेबः- ३/३ महिन्याच्या अंतराने वसुलीचा आढावा घ्यावा लागेल. कर्मचारी यांची बैठक बोलवा. बांगर साहेब दर ३ महिन्याचा आढावा घ्यावा.

मा.श्री.संपत बारस्करः- कर्मचा-यांचा वसुलीच्या प्रमाणात पगार करावा. बाहेरुन आलेल्या अधिका-यांना एक-एक झोन द्या.

मा.श्री.पाअुलबुधे विनीतः- अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (कर) व (सा.) यांना झोन द्या वसुलीकरीता.

मा.सभापती साहेबः- महानगरपालिकेमध्ये काही कर्मचारी काम करीत नाहीत. तर कामकुचार करणा-या कर्मचारी पहा.

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे :- माझ्याकडे चारही झोन आहे. मी वेळोवेळी बैठका घेऊन वसुली केली आहे. नागरिकांची नकारत्मकता येते. शहरामध्ये विकासकामे होत नाही. त्यामुळे नागरिक पैसे भरत नाहीत. तसेच रिव्हीजन होणे आवश्यक आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा टॅक्स वाढला पाहीजे. त्यासाठी ठेकेदार संस्थेस कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत गाळे व पत्राशेड यांना भाडेपट्टी आकारणी करावी.

मा.श्री.संपत बारस्कर:- वृक्षकर जमा बाजू किती दाखविली. वृक्षकर किती आहे. तसेच वृक्षकर हा वेगळा जमा करावा. शहरात झाडे लावणेकरीता पैसे मिळत नाही.

मल्यु निर्धाकर संकलन अधिकारी श्री.बांगर:- १ टक्का वृक्षकर आहे. तो प्रोपर्टीनुसार आहे. यावर्षी वृक्षकरामध्ये ३८ लाख वसुली झाली आहे.

मा.श्री.संपत बारस्कर:- वृक्षकर स्वतंत्र जमा करावा. त्याचे हेड वेगळे करावे. मागिल जमा झालेला वृक्षकर व चालु वेगळा करावा.

मा.मुख्यलेखाधिकारी:- वेगळे पैसे ठेवता येईल. मागिल जमा झालेला वृक्षकर ठेवता येणार नाही. यापुढे ठेवता येतील. हेड वेगळे करता येईल. तसेच वृक्षकर जमा व खर्च हे हेड वेगळे ठेवता येईल. व त्यानुसार वृक्ष खर्चाची बिले अदा करता येतील.

मा.श्री.संपत बारस्कर:- महानगरपालिकेच्या मुख्य चौकातील ओपन स्पेसमध्ये वृक्ष लागवड करा. त्यासाठी पैसे ठेवा. त्यासाठी खड्डे खोदण्याची जबाबदारी मनपाची आहे.

मा.मुख्यलेखाधिकारी साहेब:- वृक्ष लागवड करण्याकरीता यावर्षी १ कोटी २५ लाखा तरतुद केली आहे. वृक्षकरातुन जमा होणारी रक्कम लागवडीकरीता येणा-या खर्चाची बीले त्यातुनच अदा करावे. इतर कामी करीता वृक्ष कराचे पैसे वापरता येणार नाहीत. वेगळी अकौंट करु त्यामध्ये पैसे ठेऊ.

मा.श्री.संपत बारस्कर:- मनपाने वृक्षारोपनाकरीता खड्डे खोदुन द्यावे लागतील. त्याकामी प्रभागातील ओपनस्पेस घ्यावी.

मा.शेख नजीर अहमद अ.रज्जाक:- वृक्षरोपन करतांना लाईट तारा, रस्ता व ड्रेनेज लाईन पाहुन वृक्ष लागवड करा.

मा.श्री.पाऊलबुधे विनीतः- मनपा हद्दीतील शासकीय इमारतीवरील थकबाकी बाबत काय कारवाई केली.

मु.निर्धा.कर संकलन अधिकारी श्री.बांगरः- शासकीय इमारतीवरील ११ कोटीची थकबाकी आहे. त्यावर पाठपुरावा चालू आहे. प्रत्येक थकबाकी बाबत २ वेळा पत्र दिले आहे.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरेः- मनपाची येणे असणारी रक्कम व त्याच विभागास महानगरपालिकेकडून देणे असलेल्या रक्कमेचे समायोजन करणे आवश्यक आहे.

मा.श्री.पाऊलबुधे विनीतः- मा.जिल्हाधिकारी यांचे मिटींगमध्ये थकबाकी सांगितले. तर साहेबांशी चर्चाकरुन घ्या.

मुल्य निर्धाकर संकलन अधिकारी श्री.बांगरः- रक्कम रु. ६७ लाख एम.एस.ई.बी. येणे आहे. आपल्या देयकातुन ते वजा करता येईल. सर्व कार्यालयाकडून महानगरपालिकेचे येणे असलेल्या रक्कमेची मा.जिल्हाधिकारी साहेब यांना यादी देऊन त्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी साहेब यांचेशी बैठक घ्यावी लागेल.

अग्निशमन विभाग सुप्रिटेंट श्री.शंकर मिसाळः- सन २०२३-२४ यावर्षाकरीता कर प्रस्तावित केला आहे. त्यामध्ये सन २०२३-२४ पासुन २% वाढ वावयाचा आहे.आपण ना हरकत प्रमाणपत्र देतो. तसेच इमारतींना वेगवेगळे दर लावतो. त्यानुसार दरवषी यातुन २० ते २५ लाख भरणा जमा होतो.

मा.सभापती साहेबः- लेखाशिर्षकात रक्कम रु.२० लाखाने वाढ करण्यात यावी.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरेः- महानगरपालिकेस मुद्रांकशुल्का पोटी ८ ते १० कोटी भरणा जमा होतो. मा.शासनाच्या नियमानुसार येतात त्यानुसार आपण खर्च करतो.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- मुंबई नर्सिंग ॲक्ट फि नियमावली २००४ नुसार फी आकरतो. प्रति ५ बेडकरीता रक्कम रु.३५००/- प्रमाणे आकारणी करतो. ३ वर्षे लायसन्स वैधता (Valid) असते. याकामी ५ लाख तरतुद केली आहे. महानगरपालिका हद्दीमध्ये एकुण २१५ हॉस्पीटल आहेत.

मा.श्री.पाऊलबुधे विनीतः- हॉस्पीटल संख्या कमी आहे. ब-याच हॉस्पीटलची नोंद नाही.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- नागरी आरोग्य केंद्रामार्फत तपासणी करतो. नर्सिंग ॲक्ट १९४९ ला सुरु झाला. त्यानुसार संबंधित डॉक्टर यांची डिग्री त्यांच्या हॉस्पीटलचे स्ट्रचर व हॉस्पीटल मधील उपकरणे यांची पहाणी करणे अशी तरतुद आहे. बांधकाम परवानगी पहातो. टॅक्स वसुली पाहतो. सर्व कागद तपासणी करतो. अग्निशमन टॅक्स पहातो. याशिवाय क्लिनिकचे रजिस्ट्रेशन होत नाही.

मा.श्री.संपत बारस्करः- मनपा हद्दीतील गरीब रुग्णासाठी उपचाराकरीता मनपा रुग्नालयास काही सुचना करु शकतो का?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- ट्रस्ट ॲक्टनुसार नोंदणी कृत हॉस्पीटलला त्यांच्या उपलब्ध बेड वरुन १० % बेड आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे.

मा.श्री.संपत बारस्करः- १० % आरक्षण किती हॉस्पीटल आहे. याची तुमच्याकडे नोंद आहे का? बेडला रजिस्ट्रेशन तुम्ही परवानगी देता का?

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगेः- १० % बेड राखीव ठेवणे बंधनकारक आहे. बांधकाम परवानगी पाहीले पाहीजे. FSI नुसार बेड राखीव ठेवले का ते पहावे. या गोष्टी पाहील्या जात नाहीत. आरोग्य अधिकारी योग्य रितीने काम करीत नाहीत.

मा.श्री.संपत बारस्करः- परवानगी देताना आर्थिक दृष्या गरीबांना १०% आरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- एखाद्या रुग्नालयात उपचार सुरु असलेल्या गरीब रुग्नाचे बिल कमी करणे संदर्भात रुग्नांचा फोन आल्यास रुग्नालयाची संपर्क करुन बिल कमी करणे बाबतची कर्यवाही केली जाते. करतो.

मा.श्री.संपत बारस्कर :- १०% आरक्षीत बेड बाबत ज्यांना एक्झीकीटीव्ह परवानग्या दिल्या होत्या त्या दाखवा.

मा.सभापती साहेबः- कोणत्या हॉस्पीटलला परवानग्या दिल्या त्याची माहिती दया.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे : - २१५ हॉस्पीटल आहेत.

मा.सभापती साहेबः- टास्क फोर्स तयार करा.अचानक हॉस्पीटलला व्हिजीट करा १०% आरक्षीत केलेली आहेत की नाहीत ते पहा.

मा.श्री.संपत बारस्करः- १०% हॉस्पीटल तपासणी करीता मा.उपायुकत श्री.डांगे यांची नियुक्ती करा.

मा.सभापती साहेबः- गरीब रुग्णाच मृत्यु झाल्यास पैशा अभावी डेड बॉडी दिली जात नाही. अशी डेड बॉडी ठेवणे बंधनकारक आहे का ?

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- नाही, डेड बॉडी देत नाही असे नाही. बॉडी देणे बंधनकारक आहे. या करीता प्राधिकारी ठरवलेल्या आहेत. ॲथॉरीटी शासन नेमते. शहराकरीता म.ओ.एच.नेमलेला आहे.तक्रार माझ्याकडे येणे आवश्यक आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगेः- बांधकाम परवानगी नगररचना विभागाने पहावी.श्री.बोरगे आयुक्तांच्या अंडर आहेत. ते परस्पर निर्णय घेतात.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- शासनाचे नियम आहेत.त्यानुसार काम करतो.

मा.श्री.पाअुलबुधे विनीतः- आयुक्तांच्या नियमावलीनुसार काम करणे आवश्यक आहे.बांधकाम परवानगी नगररचना विभागाने परवानगी देणे पुर्वी फाईल आयुक्तांकडे पाठविणे.

मा.श्री.संपत बारस्कर :- यापुर्वी दिलेल्या परवानगी तपासणी बाबत सांगा. तपासणी पथकमध्ये कोण विशिष्ठ अधिकारी घेणार

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- रॅपीड सर्व्हे करु सर्व्हे बाबत काहीच अडचण नाही श्री.डांगे साहेबां बरोबर काम करू

मा.सभापती साहेबः- आदेश काढण्यात यावेत. किती हॉस्पीटल रेसिडेन्सीयल झोनमध्ये काम चालू आहे.सोनोग्राफी सेंटर बंद केले.काही हॉस्पीटल मध्ये सोनोग्राफी सेंटर चालु आहेत. काही ठिकाणी गर्भलिंग निदान चाचण्या केल्या जातात त्याबाबत काही तक्रारी आहेत का?

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- नाही सन २०१५ मध्ये आली होती. त्यानुसार पुढील कारवाई करण्यात आलेली आहे.

मा.सभापती साहेब :- सोनोग्राफी सेंटर किती आहेत. बांधकाम परवानगी पहाता का? नुक्लियस हॉस्पीटलला परवानगी आहे का?

वैदयकीय आरोग्य अधिकरी श्री.बोरगेः- १०८ सेंटर आहेत. PCPNDT कायद्या अंतर्गत कामकाज चालते. रजिष्ट्रेशन आपण देतो. टॅक्स भरण्याची पावती पहातो. त्यानुसार रजिस्ट्रेशन करतो. निक्लियस हॉस्पीटलची फाईल पहातो.

मा.श्री.पाउलबुधे विनीतः- महानगरपालिका हद्दीतील सर्व हॉस्पीटलची परवानगी पाहून घ्या.

मा.श्री.संपत बारस्करः- डॉ.बोरगे,तुम्हाला वरिष्ठ कोण आहेत.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगेः- उपायुक्त नंतर आयुक्त नंतर विविध समित्यांचे सभापती असतात.

मा.श्री.संपत बारस्कर :-मा.सभापतींना अधिकार असतात. आपण सुचना केल्यावर यांना अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- किती ओपीडींनी परवानगी घेतली आहे. अनाधिकृत किती बांधकाम आहे. नविन वैदयकीय व्यावसायीक यांची माहिती सांगा. या लेखाशिर्षामध्ये वाढ करण्यात यावी. सोनोग्राफी शुल्क कोण जमा करते.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- ॲथोरीटी नावाने अकौंट काढून शासनास जमा करावी लागेत.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेस काही फी घ्या.

वैदयकीय आरोग्यअधिकारी श्री.बोरगे :- सोनोग्राफीकरीता नियमानुसार फि घेण्यात येते. महानगरपालिकेची फी लावता येत नाही.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल या दृष्टीने छाननी फी लावली तर  महानगरपालिकेस फायदा होईल.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- तपासणी करून पहातो. क्लिनीकडुन १२०० ते १४०० रु. फि घेवू शकतो.सोनोग्राफी करीता घेवू शकत नाही.

मा.सभापती साहेब :- वैदयकीय परवाना म्हणून फि घ्या. ओपीडी साठी १०००/- रु. फि घ्या. मुंबई नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत या लेखाशिर्षकामध्ये रक्कम रु.१५ लाखाची वाढ़ करण्यात यावी.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- मार्केट विभागा अंतर्गत महानगरपालिका मालकीचे गाळे, मंगल कार्यालय, खुल्या जागा तसेच इमारतीचे भाडे वसुल केले जाते. सन २०२२-२३ मध्ये या लेखाशिर्षा अंतर्गत ३.५० कोटी तरतुद करण्यात आलेली होती त्या मधून  रू.८० लाख वसुल झाले. गाळेभाडे १० मार्च अखेर एकुण ८० लाख रुपये वसुल झालेले आहेत.

मा.सभापती साहेबः- अंदाजीत रक्कम मोठ्याप्रमाणावर असतांना वसुली ना मात्र आहे. बाकी गाळेधारक का भरू शकत नाही.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- रजिष्टर वरून आकडे दिलेले आहेत.काही चेक आलेले आहेत.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- दि.२२/२ चे पत्रानुसार बुरूडगांव वसुली विभागाकडील श्री. आव्हाड यांचा रक्कम रु.७७४२४/- चा धनादेश बाऊस झाला होता. सदर बाउन्सचा चेक संबंधित विभागाला पाठविण्यात येवुन त्या बदल्यात रोख स्वरूपात भरणा करणे बाबत नोटीस देतो.रोख कॅश भरून घेतो.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे:- सावेडी महानगरपालिका कार्यालय सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील गाळा थकबाकी साठी सिल केला.नंतर तो गाळा उघडला गेला.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- थकबाकी भरल्यानंतर गाळा उघडून दिला.दुसरा गाळा उघडला आहे.त्यांना पत्र दिले आहे.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- सिल केलेला गाळा उघडुन दिला.दुसरा गाळा उघडला आहे.गाळा परस्पर उघडले.फौजदारी गुन्हा आहे की नाही.तुम्ही फौजदार केली का?

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- माझ्या पुर्वीचे विभाग प्रमुख श्री.वखारे यांनी गाळा उघडुन दिला थकबाकी पैकी निम्मे पैसे भरल्यानंतर उघडुन दिला.

मा.श्री.संपत बारस्कर :- दोन गाळे सिल केले होते.एका गाळयाचे पैसे भरले.गाळा उघडुन दिला.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- गाळयांवर काय कार्यवाही करणार.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- नगरसेवकांचे नांव पुढे करू नका.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- गाळयावर कारवाई करा.परस्पर गाळा उघडल्याप्रकरणी फौजदारी दाखल करा.सिल गाळे पहा.गाळे परस्पर उघडतात ते कोण पहाणार.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- पहाणी करून गाळा सील करा.

मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.पवार :- गाळयांची संख्या आकडेवारी पहा.दर तीन वर्षानी फेरलिलाव करावा.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- ८४२ गाळे आहेत.रेडीरेकनार नुसार आकारणी करण्यात येते.गाळेधारकांना रेडीरेकनर दर मान्य नसल्याने हस्तांतरण करत नाही.

मा.मुख्य लेखापरिक्षक श्री.पवार :- महानगरपालिकेच्या गाळ्यामध्ये गाळेधारक पोट भाडेकरू ठेवून पैसे कमावतात.महानगरपालिकेस याचा काही फायदा नाही.

मा.सभापती साहेब :- पोटभाडेकरू आहेत. हस्तांतर दर मान्य नाहीत. त्यामुळे बैठक घेवून निर्णय घेण्यात यावा. गाळेधारकांची बैठक घेवू निर्णय घेवू.गाळेधारकांची बैठक लावा.पुढचा विषय घ्या.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरेः- महानगरपालिकेच्या गाळ्या संदर्भात एकत्रित प्रस्ताव महानगरपालिका सभेपुढे ठेवा.

मा.सभापती साहेब :- पुढच्या सभेत गाळेधारकांचा विषय घ्या.

श्री.सासवडकरः- विकासपरवाना - प्रस्ताव दाखल ६० लाख तरतुद होती ८० लाख केली.

मा.सभापती साहेब :- २ कोटीची वाढ सुचविण्यात येत आहे.

श्री.सुभोध देशमुख,जाहिरात कर विभागः- महानगरपालिका हद्दीत मनपाच्या जागेत २७ जाहिरात बोर्ड आहे. त्यांची ५०% वसुली आहे.

मा.सभापती साहेबः- "जाहिरात बोर्ड जागा भाडे " या लेखाशिर्षाअंतर्गत जाहिरात बोर्ड बाबत राज्यसरकारने केलेल्या नियमांची अंमलबजावणी करून आकारणी दराची नियमावली लागु झाल्यानंतर या उत्पन्नमध्ये वाढ होणार असलयाने या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये ५० लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेबः- एलईडी पोलवर जाहीराती पासुन महानगरपालिकेस किती पैसे मिळणार ?

प्र.विद्युत वि. प्रमुख श्री.जोशीः- प्रती पोल प्रतिमहा ४००/- रुपये मिळणार आहेत.

मा.सभापती साहेब : या लेखाशिर्षात वाढ करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या मालकीच्या किती शाळा आहेत. त्यामध्ये किती खोल्या आहेत.

श्री.पठाण सर : १२ शाळा आहेत. त्यामध्ये ७७ वर्ग आहेत. बंद शाळा ७ आहेत. मार्केट विभाग वसुली करतो.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणे : शाळांना बील देतो. वसुल होत नाही. मागणी २५ लाख होती. १ ते १.५० लाख वसुल झाली आहे.

मा.सभापती साहेबः- वसुल कमी आहे. वसुल होणे आवश्यक आहे.

मार्केट वि.प्रमुख श्री.सोनवणे : शासनाची ग्रँन्ट आल्यावर देतो असे सांगतात.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे : वसुल न झाल्याने बजेट फुगीर होते.

मा.सभापती साहेब : वसुल करा नोटीसा द्या. भाडे घ्या. ३ नंबर शाळा व्यतिरिक्त इतर संस्थांना शाळा देतात. वसुल करा.

मार्केट वि.प्रमुख श्री.सोनवणे : ग्रॅन्ट नाही म्हणुन भरत नाही. थकीत शाळांना नोटीस देतो.

मा.सभापती साहेब :- ३ नंबर शाळा १ नंबर खोली कोणाच्या ताब्यात आहे. त्या महानगरपालिका ताब्यात घ्या. अवाल सादर करा.

मार्केट वि.प्रमुख श्री.सोनवणेः- ३ ठिकाणी पे ॲड पार्क आहे. सदरचे काम हे ठेकापध्दतीने दिलेले आहे. २५ हजार वसूल झाले.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :- ३ ठिकाणी पार्किंग असुन फक्त २५ हजार वसुल झाले. सन २०१९-२०२० ला ३.१४ लाख आले आता का नाही.

मार्केट वि.प्रमुख श्री.सोनवणेः- स्वास्थ्य हॉस्पीटल जवळ पार्किंग आहे. त्यांना नोटीस दिली.

मा.सभापती साहेबः- त्यांचेवर कारवाई करा. डिपॉझिट किती आहे. डिपोजित मधुन वसुल करा.

मार्केट विभाग प्रमुख श्री.सोनवणेः- पावतीनुसार पैसे घेत नाही. जागा भाडे नुसार घेतो. रिमांईंडर दिले. कारवाई करु.

मा.श्री.सुनिल त्र्यंबकेः- गांधी मैदान पावती घेतात त्याचे काय.

मार्केट वि.प्रमुख श्री.सोनवणेः- महानगरपालिकेच्या ताब्यात नाही.

मा.सभापती साहेबः- महानगरपालिका ठरावानुसार पे ॲण्ड पार्क जागा निश्चित झाली आहे. तरतुद ठेवण्यांत येत आहे. अनधिकृत पार्किंग पावती बाबत.

मा.श्री.विनीत पाउलबुधे : अनधिकृत पार्किंग बाबतीत असेल तर त्याचा प्रस्ताव द्या. पार्किंगचा टेंडर काढा. इतर जागा असतील तर त्यांचे प्रस्ताव द्या. अतिक्रमण कोणते आहे.

अभियंता श्री.इथापे :- अतिक्रमणचे काम ADTP यांना दिले नाही.

मॅ.इंजि.निकम :- पार्किंगचा डीपीआर पार्किंग पॉलिसी बनवली आहे. सम विषम तारखेनुसार तयार केला आहे. तो महानगरपालिका सभेसमोर सादर केला आहे. त्यानुसार ठेकेदार नेमून वसुल करावा लागेल.

श्री.संपत बारस्कर : मंगल कार्यालय उत्पन्न किती जमा होते.

मार्केट वि.प्रमुख श्री.सोनवणे : २ कार्यालय आहेत.

मुल्यनिधारक कर संकलन अधिकारी श्री.बांगर:- महानगरपालिका मालकीच्या मंगल कार्यालयाचे भाडे व्यावसायिक (कर्मशिल) मध्ये व्याज जमा करुन घेतो. महानगरपालिका ठरावानुसार वसूल करतो. मंगल कार्यालय जागा तपासणी करुन अहवाल द्या.

मा.मुखलेखाधिकारी श्री.मोरे:- महानगरपालिकेस मा.शासनाकडून दरमहा GST अनुदान मिळते त्यातुन पगार भागवतो. यामध्ये दरवर्षी १० टक्के वाढ होते. तथापि वेतनासाठी हि रक्कम अपुरी पडते. सबब मनपा निधीमधुन काही रक्कम वर्ग करावी लागते.

प्र.शहर अभियंता श्री.निंबाळकर:- महानगरपालिका हद्दीमध्ये गॅस कंपन्या, मोबाईल कंपन्या या लाईन टाकणे कामी रस्ते खोदाई करीता परवानगी मागतात. त्यापोटी ३० कोटी येणे अपेक्षित आहे. आता दर वाढवले आहेत. भारत गॅस यांनी दर वाढीनंतर पैसे भरले नाहीत. सदर कंपन्याचे प्रतिनिधी मा.जिल्हाधिकारी साहेब यांना भेटुन महानगरपालिकेचे रस्ता खोदाईचे दर आम्हास मान्य नसल्याने आम्ही काम करु शकत नाहीत. महानगरपालिकेने दरामध्ये मोठ्याप्रमाणात वाढ केलेली आहे. महानगरपालिकेने खोदलेला रस्ता पुर्ववत करणे कामी येणारा खर्च आमच्याकडुन घ्यावा. अशी आमची मागणी आहे. जास्त दरामुळे आम्ही काम करु शकत नाही. असे मा.जिल्हाधिकारी साहेब यांना कळविलेले आहेत. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे झालेल्या बैठकीत सदरची योजना ही केंद्राकडुन मंजुर झालेली असल्याने काम लवकरात लवकर होणे अपेक्षीत आहे. महानगरपालिकेने परवानगी दिली नाहीतर मी माझ्या अधिकारात रस्ते खोदाईस परवानगी देईन.

मा.उपायुक्त श्री.कुरे :- मा.स्थायी समितीने सुचवले दर आता महानगरपालिका सभेपुढे दर जातील. मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्या ऑफिसच्या बैठकांचे इतिवृत्त मा.महासभेपुढे घेवून त्यानुसार कारवाई करा.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरेः- हा विषय जी.बी.मध्ये घ्यावा लागेल जी.बी.ला कलेक्टर साहेब यांची बैठकीचे इतिवृत्त देवू त्यानुसार विषय घ्यावा लागेल.

मा.श्री.संपत बारस्करः- प्रशासनास किती वाढ अपेक्षित आहे.

मा.अति.आयुक्त श्री.पठारेः- प्रत्येक ठिकाणानुसार दर बदलतील रस्त्याच्या ॲव्हरेज नुसार दर आकारावे लागतील.

मा.श्री.विनीत पाउलबुधेः- पुणे मुंबई यांचे रस्ते बांधनीनुसार दर ठरविलेले आहेत.

मा.सभापती साहेबः- रस्ते खोदाई करणेकरीता ५ कोटी रु. ने वाढ करण्यांत येत आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- या हेडमध्ये कोणते पैसे भरुन घेतो.

श्री.सासवडकर :- अतिरिक्त एफएसआय चे पैसे भरुन घेतो. प्रिमीयम चे पैसे भरुन घेतो. एक एकराच्या आत भुखंड असेल तर पूर्ण पैसे भरुन घेतो. खुल्या जागेचे मूल्य म्हणुन घेतो.

मा.श्री.संपत बारस्करः- या करीता वेगळे हेड तयार करा. ओपन स्पेस व ॲम्युनिटीचे पैसे भरुन घेतात.

मा.मुखलेखाधिकारी श्री.मोरेः- असे जमा होणारे पैसे कशावर खर्च करावे असे काही आहे का ?

मा.श्री.संपत बारस्करः- ओपन स्पेसचे पैसे कशावर खर्च करावे असे काही आहे का. शहर विकास कामाकरीता असे पैसे खर्च करा. बांधकाम कडे रजिष्टर ठेवा. भूसंपादन किती पैसे शिल्लक आहेत.

मा.सभापती साहेबः- "विकास भार निधीतुन खर्च " या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटी ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

मा.मुखलेखाधिकारी श्री.मोरेः- ऑनलाईन पैसे भरतात त्याची विभागणी करुन अकौंटला पैसे येतात विकासभार मध्ये जमा होणारी भूसंपादन व विकास कामाकरीता वापरतात. टी.पी.कडून विभागणी करुन पैसे भरावेत. भूसंपादन व विकास कामांकरीता भूसंपादनाचे पैसे शिल्लक नाही.

मा.श्री.संपत बारस्करः- भूसंपादनाचे पैसे कोठे वापरले.

मा.मुखलेखाधिकारी श्री.मोरेः- लॅण्ड ॲक्वीझिशन करीता २.५ कोटी वापरले.

मा.श्री.संपत बारस्करः- रस्ता भूसंपादन करीता टीडीआर आहे. आजपर्यंत पैसे दिले नाही.

मा.अति.आयुक्त श्री.पठारे:- विकास भारचे पैशातुन बँक लोन भरुन घ्या.

मा.मुखलेखाधिकारी साहेब श्री.मोरे : आधीचे भूसंपादनाचे पैसे कोठे गेले. याची माहिती नाही. आता या वर्षापासुन वेगळे हेड तयार करु.

मा.अति.आयुक्त श्री.पठारे साहेब :- पैसे खर्च झालेले आहेत.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- सन २०१९-२० मध्ये रक्कम रु. ४ कोटी आले. सन २०२०-२०२१ मध्ये रक्कम रु. ६ कोटी आले. सन २०२१-२०२२ मध्ये रक्कम रु.१२ कोटी आले.तरतुदीमध्ये मागील तीन वर्षात रक्कम रु. १२ कोटी जमा करणे अपेक्षित होते.

मा.श्री.संपत बारस्कर:- सभेकरीता नगररचनाकार व अतिक्रमण विभागाकडील कोणीच उपस्थित नाही. तो पर्यंत सभा स्थगित करा. मा.आयुक्त व श्री.चारठानकर यांना सभेस उपस्थित ठेवा.

मा.अति.आयुक्त श्री.पठारे:- नगररचना व अतिक्रमण विभागाचे विषय सोडुन दुसरे विषय घ्या.

मा.सभापती साहेब:- नगररचना व अतिक्रमण विभागाचे विषय नंतर घेवु बाकी विषय घेवु.

मा.श्री.संपत बारस्कर:- भुसंपादन पोटी जमा झालेले पैसे कोठे खर्च केले याची माहिती द्या.

मा.सभापती साहेब:- कल्यानरोड येथील ड्रिम सिटी समोरील बाजु कोणत्या झोनमध्ये आहे.

श्री.सासवडकर:- याठिकाणी १२ मीटर सर्व्हिस रोड आहे. ग्रीनबेल्ट आहे. पण बांधकाम वाणिज्य आहे.

प्रभाग अधिकारी श्री.गोडळकर:- या भागातील लिपिकास सुचना दिल्या आहे. त्या ठिकाणची आकारणी केली नाही.

मा.सभापती साहेब:- या ठिकाणी पक्के बांधकाम केले आहे. याबाबत महानगरपालिकेस उत्पन्न नाही. ग्रीनबेल्ट आहे. अनाधिकृत बांधकामे आहेत. रस्त्यावर बांधकाम करतात. याबाबत कोण पहाणार. नेप्ती नाका चौकमध्ये अतिक्रमण आहे.ते काढले नाही. अनाधिकृत कत्तल खाने झाले आहेत. ते कोणी काढीत नाहीत. अनाधिकृत बांधकाम नियमाकुल करणे रक्कम रुपये २ कोटीची वाढ़ सुचविण्यात येत आहे.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- पाणीपट्टी या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु.१५ कोटी जमा झाले. शहरामध्ये मीटरद्वारे पाणीपुरवठा यामधुन मिळणारे उत्पन्न ४३ कोटी आहे. यामध्ये जिल्हापरिषद यांना टॅकरद्वारे पाणी पुरवठा याचे बिल आहे. थकीत रक्कमेवर व्यास मोठ्याप्रमाणावर थकीत आहे. त्यांचे जि.प.अनुदान मनपाकडे वर्ग केले तर वसुल होईल.

मॅ.इंजि.श्री.परिमल निकम:- ग्रामपंचायतीकडे ही थकबाकी आहे. रक्कम रु.७.२२ कोटी आहे. त्यावर व्याज ९० कोटी आहे. अशी एकुण ९७ कोटी आहे. सात ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा बंद केला आहे.

मा.श्री.संपत बारस्कर:- ढवणवस्तीचा पण पाणीपुरवठा बंद केला काय केले.

मॅ.इंजि.श्री.परिमल निकम:- नळ जोडणीबाबत कर्मचा-यांना बाबत सुचना दिलेल्या आहेत.अनुदानाचे पैसे आपल्याकडे वर्ग केले तर वसुल होईल.

मा.सभापती साहेब:- अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम हाती घेवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. "अनाधिकृत नळ निमानुकुल करणे "या बाबत योजना जाहिर करण्यात यावी.यास्तव या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रू.१ कोटीची वाढ करण्यात यावी.

मा.श्री.विनीत पाउलबुधे:- सरकारी कार्यालयाकडे थकबाकी आहे. याबाबत मा.जिल्हाधिकारी साहेबां बरोबर बैठक घेऊ.

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगे:- शासकीय कार्यालयाचे पैसे राहतात. त्यांना अनुदान कमी येते. त्यामुळे वसुली होत नाही.

मॅ.इंजि.श्री.परिमल निकम:-अमृत २ व नगरत्थान यामध्ये ३०% ने तरतुद वाढवा.

मा.सभापती साहेब:- अमृत २.०/नगरोत्थान योजना अनुदान-नविन लेखाशिर्षक निर्माण करुन रक्कम रु.१०० कोटी तरतुद दर्शविण्यात यावी. तसेच अमृत २.०/नगरोत्थान योजना मनपा हिस्सा नविन लेखाशिर्षक निर्माण करुन रक्कम रु.३० कोटी तरतुद दर्शविण्यात यावी.

मा.उपायुक्त श्री.कुरे साहेब:- प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत संजय नगर ही साईट चालु आहे. २९८ पैकी ३३ घरकुलांचे काम झाले आहे. घराची किंमत पुर्वी ६.५३ होती. तरी आज १०.९३ झाली आहे. ७ लाख करण्यास लाभार्थी तयार नाहीत. वाढ़ीव निधीचा प्रस्ताव मा.शासनास सादर केला आहे. काम करण्यास कोणीही तयार नाही. ४.५८ लाख वाढीव खर्च येणार आहे.

मा.श्री.संपत बारस्कर:- मनपा स्वता:चा त्यात हिस्सा करु शकतो का? भुसंपादनाचे पैसे त्यात टाका.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- भुसंपादनाचे पैसे खर्च रजि.आमच्याकडे द्या.

मा.श्री.विनीत पाउलबुधे:- सावेडी गावढाण स.नं.करणे. त्या ऐवजी उपनगरासह उल्लेख करावा.

मा.सभापती साहेब:- मोकाट जनावरे

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- मोकाट कुत्रे तक्रार आहे. कुत्रे पकडत नाहीत. कुत्रे पकडणे काम रात्री करा.

वैद्यकीय अधिकारी श्री.राजुरकर:- आपण महानगरपालिका हद्दीमध्ये कुत्रे पकड्न्याचा ठेका दिलेला आहे. दिवसा कुत्रे पकडणे बाबत काम चालु आहे. रात्री कामा करणे बाबत ठेकेदाराशी बोलतो.

मा.पल्लवी जाधव:-ॲनिमल वेस्ट बाबत तक्रार करूनही काम होत नाही.वेस्ट टाकतात.सी.सी.टि.व्ही. बसवा.हॉटेल सनी पॅलेस शेजारी कॅमेरे बसवा.

मुख्यस्वच्छता निरीक्षक श्री.बिडकर:- पुर्वीचा ठेकेदार होता.त्याच्याकडे वहाने होती.नविन ठेकेदाराकडे वहाने नाहीत.आपण सांगितल्यावर ते वे वेस्ट घेवूनजातात.

मा.सभापती साहेब:- ॲनिमलवेस्टची गाडी २४ तास फिरत नाही.त्यांना बंधनकारक करा.सिनानदी पुलाजवळ वेस्टेज टाकतात. तेथील टपरी धारकाना नोटीस काढा.

मा.पल्लवी जाधव:- रस्त्यावर कुत्रे,मांजरी मरून पडतात.ते उचलत नाहीत.

मुख्यस्वच्छता निरीक्षक श्री.बिडकर:- या करीता गाडी आहे.तक्रार आल्यानंतर कार्यवाही करतात. दुपारी २ नंतर उचलतात.

मा. शेख नजीर अहमद अ.रज्जाक:- कोठला भागामध्ये वेस्ट ॲनिमल उचलत नाहीत.सफाई कामगार काम करीत नाहीत.

मा.सभापती साहेब:- सफाई कर्मचारी सेवा निवृत्त झाल्यानंतर त्या जागेवर पुन्हा कर्मचारी देत नाहीत.

मा.पल्लवी जाधव:- नवीन कर्मयारी भरती करा.प्लास्टीक कचरा टाकल्यानंतर कारवाई करा.वॉर्ड क्र.१ मध्ये भाजी बाजार आहे.तेथील खडयांमध्ये प्लौस्टीक मध्ये बांधून कचरा टाकतात.त्यांच्यावर करावाई करा.

मा.सभापती साहेबः- मा.महापौर शहर विकास निधी रू.२ कोटी ५० लाख, "मा.उपमहापौर शहर विकास निधी "रू.१ कोटी ५०लाख, "मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी" रू.५० लाखची तरतुद दर्शविण्यात यावी. मा.सभापती,महिला व बाल विकास निधी रू.१५ लाख दर्शविण्यात यावी. मा.उप सभापती,महिला व बाल विकास निधी रू.१० लाख दर्शविण्यात यावी. मा.सभागृह नेता शहर विकास निधी रू.५० लाख दर्शविण्यात यावी. मा.विरोधी पक्षनेता शहर विकास निधी रू.५० लाख दर्शविण्यात यावी. तसेच प्रभाग क्र.१३ नालेगाव भागातील नानापाटील वस्ताद तालीम बांधणे व याकरीता जिम साहित्य खरेदी करणे या कामा करीता रू.४० लक्ष खर्च "अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री.बिडकरः- भाजी बाजार अनाधिकृत आहे.

मा.श्री.विनीत पाअलबुधेः- इथापे साहेब,काय काम करतात.

अतिरीक्त आयुक्त श्री.पठारेः- इथापे यांचे विभागप्रमुख श्री.चारठाणकर आहेत.ते काम देतील

मा.सभापती साहेबः- मोकाट कुत्रे पकडा.रात्रीच्या शिष्टमध्ये काम सुरू करा.

उपायुक्त श्री.डांगे :- दिवसाकाम करावे लागेल.रात्री काम करता येणार नाही.

वैद्यकीय अधिकारी डॉ.राजुरकर :- रात्री १० वाजेपर्यत काम करू.

मा.सभापती साहेबः- मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता "अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम "या लेखाशिर्षा मध्ये रू.२ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मा.पल्लवी जाधवः- कर्मचा-यांना डेस कोर्ड दया,आयकार्ड दया, नागरीकांना कर्मचारी आहे म्हणुन कळेल. केलेल्या कामाचे कर्मचा-यांकडून अपडेट घ्या.

मा.श्री.विनीत पाअुलबुधेः- चिकन टपरीधारक बाबत ठराव झालेला आहे.त्यांनी परवाना घेण्या बाबत सक्ती केली आहे का.२८/०८/२०१७ चा ठराव आहे.लायसन्सची सक्ती करणे.कर आकारणे बाबत ठराव आहे.ॲनिमल वेस्ट बाबत ठराव आहे.संकलन व वाहतुकी बाबत.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- पुर्वी  हा विभागा वैदयकीय आरोग्य विभागाकडे होता.सध्या हा विषय घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे आहे.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे:- ठरावाची अंमलबजावणी केलीच नाही.२०१७ चा ठराव आहे.ठराव करून सुध्दा कामे करीत नाहीत.२०१७ पासुन पाच वर्षे झाले.महानगरपालिकेचा महसुल बुडाला याला जबाबदार कोण.शहरामध्ये याच्या पाच हजार टप-या असतील.

अतिरीक्त आयुक्त श्री.पठारे :- ठराव झाल्यावर तो विभागाकडे जातो.त्यानुसार त्या विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.ठराव झाल्यानंतर तो मा.आयुक्तांकडे जाउन त्यावर मा.आयुक्तांची सही आवश्यक आहे.आपल्याकडे ठराव सहीकरीता मा.आयुक्तांकडे येत नाहीत.

मा.उपायुक्त श्री.डांगे:- जबाबदार कोण ते ठरवु.त्यानुसार पुढील कारवाई करू.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे:- गेल्या पाच ते सहा वर्षातील ठरावांची अंमलबजावणी झाली का नाही याची तपासणी करा.

मा.सभापती साहेब:- ठराव पहा,डांगे साहेब हया पेंडींग कामाची चौकशी करा दोर्शीवर कारवाई करा.

मा.श्री.विनीत पाऊलबुधे:- अनाधिकृत बाजार हटवा.

मा.सभापती साहेब:- जाने.२०२३ कर्मचारी भविष्य निर्वाह निधी परत देणे रू.१.२६ लाख देणे आहे.त्याचे काय.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- जी.पी.एफ.ची तुट १० ते ११ कोटी आहे. रू.९ कोटी जी.पी.एफ मध्ये गेले नाही.नविन पेंन्शनर कर्मचा-यांची तीच परिस्थीती आहे.

मा.सभापती साहेब:- सर्वानी मास्क वापराबाबत नागरिकांमध्ये आव्हान करावे. अमृत भुयारीचे कामाची काय स्थिती आहे.

प्र.शहर अभियंता श्री.निंबाळकर:- टप्पा १ मध्ये ८०% पेक्षा जास्त काम झाले. पंपींग मशिनरी काम चालु आहे. मार्च अखेर पर्यत होईल का? नाही पण मे पर्यंत होईल. टप्पा दोनला तांत्रिक मंजुरी करीता एम.जी.पी.कडे सादर केले आहे.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- नविन रस्ते विकसीत करणे. १३ कोटी तरतुद केली आहे.

मा.नगररचनाकार श्री.चारठाणकर:- रेखांकन अंतर्गत सुधारणे पोटी विकासक स्वताः विकास कामे करतात. महानगरपालिकेकडे पैसे भरत नाहीत. विकास कामे केल्याबाबत विभागांचे प्रमाणपत्रे घेवुन सादर करतात.

मा.श्री.संपत बारस्कर:- मागील वर्षी रेखांकन अंतर्गत सुधारणा मध्ये किती पैसे जमा झाले होते.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- २ कोटी १० लाख आले. प्रत्येक्षात बांधकाम परवानगी २० लाख जमा झाले.

मा.सभापती साहेब:- अंतर्गत सुधारणामध्ये २.५० कोटी तरतुद करा.

मा.श्री.संपत बारस्कर:- बांधकाम परवानगी ५० लाख तरतुद करा.

मा.सभापती साहेब:- बांधकाम परवानगी ५० लाख तरतुद करा.

प्र.शहर अभियंता श्री.निंबाळकर:- नविन रस्ते बांधने करीता १३ कोटी बजेट आहे. त्यातुन रस्ते बिल देणे.

मा.सभापती साहेब:- वॉर्ड विकास निधी तरतुद किती? साहेब नगरसेवकाचा स्वच्छा निधी वाढवा.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- निधी काही नाही.

मा.सभापती साहेब:- दोन ही निधी मधुन १५ लाख प्रत्येक नगरसेवकांना करा. वॉर्ड विकास निधी व नगरसेवक स्वेच्छा निधी. तो पण रोख स्वरुपात करा.

मा.श्री.संपत बारस्कर:- पण या निधीतुन ५ लाख निधी हा प्रत्येकाने वृक्ष लागवडीकरीताच खर्च करावा याबाबत बंधनकारक करावे.

मा.सभापती साहेब:- पण उपनगरामध्ये वृक्ष लागवडीकरता करता येईल. गावामध्ये वृक्ष लागवड करता येत नाही. तर तो निधी चौक सुशोभिकरणाकरता करण्यात येईल.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे:- नवीन पोल टाकणे. निधी वाढ़वा.

उपशहर अभियंता पा.पु.विभाग श्री.सातपुते:- पिंपळगाव तलाव सुशोभिकरण व इतर कामाकरीता १ कोटी तरतुद केली आहे. अमृत योजने अंतर्गत पैसे येणार आहेत.

मा.श्री.संपत बारस्कर:- चटई क्षेत्राकरिता किती तरतुद ठेवण्यात आली आहे?

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- १० कोटीची तरतुद ठेवण्यात आली आहे.

मा.सभापती साहेब:- पुतळे बसविणे बाबत माहित द्यावी.

प्र.शहर अभियंता श्री.निबांळकर:- छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे चार पुतळे बसविणेबाबत कार्यवाही सुरु आहे. यावर्षी दोन पुतळ्यांची तरतुद केली आहे.

मा.सभापती साहेबः- हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे बाबतची निविदा मा.स्थायी समिती मध्ये निविदा मंजूर झालेली असून श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयाचे बॅकराउंड या कामा करीता रक्कम रूपये १ कोटी वाढ "पुतळे बसविणे "या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.एकुण रक्कम रू.३ कोटी ५० लक्ष दर्शविण्यात यावी.तसेच राष्ट्रपुरूष महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा माळीवाडा वेशीमध्ये बसविण्यात यावा. महापुरूष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा मार्केट यार्ड चौकामध्ये बसविण्यात यावा,छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा सावेडी भागातील प्रोफेसर चौक येथे बसविण्यात यावा या कामा करीता येणारा खर्च "पुतळे बसविणे" या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा. तसेच शहर व उपनगररामध्ये "नविन इलेक्ट्रीक पोल बसविणे" या लेखाशिर्षा अंतर्गत २५ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे व अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम हाती घेवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. "अनाधिकृत नळ निमानुकुल करणे "या बाबत योजना जाहिर करण्यात यावी.यास्तव या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटी २ लाखाची वाढ करण्यात यावी. तसेच"नविन गटर" या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुदीमध्ये रक्कम रु.५० लाखाने कपात करण्यात यावी. "वॉर्ड विकास निधी" या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रू.२ कोटी ३२ लाख तरतुद करण्यात यावी. मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी या लेखाशिर्ष अंतर्गत प्रशासनाने केलेली तरतुद अत्यल्प असल्याने मा.नगरसेवकांना आपल्या प्रभागामध्ये तातडीचे कामे करावी लागतात एकुण नगरसेवकांची संख्या विचारात घेता प्रत्येक नगरसेवकांस मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी व "वॉर्ड विकास निधी" असे एकत्रित रू.१५ लाख प्रमाणे , कामे सुचविता येतील. सौ.पुष्पाताई अनिल बोरुडे, सभापती महिला व बालकल्याण समिती यांचे प्राप्त पत्रानुसार मा.शासन निर्णयानुसार महिला व बालकल्याण समिती करीता एकुण अंदाजपत्रकाच्या ५% नियमानुसार करण्यात आलेली तरतुद रोख स्वरुपात करण्यात यावी. मा.केंद्र शासन व मा.राज्य शासन यांच्या

मार्गदर्शनानुसार स्वच्छता अभियान राबविण्यात येते. शहर स्वच्छ होणेकामी घनकचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत अहमदनगर शहरातील चार प्रभाग समिती यांना प्रत्येकी एक "गारबेज पिकर मशिन" चार नग उपलब्ध करुन देण्यात याव्या. याकामी येणारा अंदाजे रक्कम रु.८० लक्ष खर्च १५ व्या वित्त आयोग (घनकचरा व्यवस्थापन) मधुन भागविण्यात यावा. तसेच महानगरपालिकेच्या मालकीचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी सुसज्य ग्रंथालय उभारावे व स्मारकाची देखभाल दुरूस्ती सदरचा खर्च "इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षा" अंतर्गत करण्यात यावा. या कामा करीता रक्क्म रूपये २५ लाखांची तरतुद मध्ये वाढ करण्यात यावी.

मा.नगररचनाकार श्री.चारठणकरः- रेन वॉटर हारवेस्टींग बाबत शासनाने बंधनकारक केलेले आहे. मनपाच्या मालकीच्या ओपनस्पेस मधील रेनवॉटर हारवेस्टींग करणेबाबत सुचविले आहे. त्यात शासकीय कार्यालयांच्या इमारती, मनपाच्या मालकीच्या इमारती रेनवॉटर हारवेस्टींगमध्ये घ्याव्या लागणार आहेत. त्याबाबत दर १५ दिवसाला शासनाकडून आढावा घेतला जाणार आहे.

मा.उपायुक्त (कर) श्री.डांगेः- माझी वसुंधरामध्ये रेन वॉटर हारवेस्टींगचे काम केलेले आहे. मनपा मालकीच्या पाच इमारतीवर रेन वॉटर हारवेस्टींगचे काम केले आहे.नगररचना विभागाने पहाणी करावी. माझी वसुंधरामध्ये डि.पी.आर.मंजुर आहे. त्याकरीता १.५० कोटी आहे. त्यामध्ये जुन्या विहीरी, बोअरवेल पुनर्भरनचा समावेश आहे. पुर्णत्वाचा दाखला देतांना रेन वॉटर हारवेस्टींग योजना कार्यान्वीत केली आहे किंवा नाही याची पहाणी करावी.

मा.नगररचनाकार श्री.चारठानकरः- घरमालक एखादे वर्षी रेन वॉटर हारवेस्टींग योजना राबवितात. बंद पडल्यानंतर पुन्हा चालु करीत नाही. सदर कामाची दरवर्षी पहाणी करण्यात यावी. शासकीय इमारतीवर ३० एप्रिल पर्यंत रेन वॉटर हारवेस्टींगचे काम करणे बंधनकारक केलेले आहे.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरेः- सदर कामाकरीता टोकन तरतुद ठेवु.

मा.उपायुक्त श्री.कुरेः- मनपाच्या शाळांवर रेन वॉटर हारवेस्टींग करा.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरेः- ५ लाख ठेवा.

मा.सभापती साहेबः- ५० लाखा ठेवा. रेन वॉटर हारवेस्टींग करीता.

मा.श्री.संपत बारस्कर:- विकासभार भुसंपादनमध्ये १५ कोटी शिल्लक आहेत अशी माहिती नगररचनाकार यांनी दिली होती. त्या १५ कोटींचे कोठे खर्च केले याची माहिती द्यावी.

मा.नगररचनाकार श्री.चारठाणकर:- आमच्या विभागाकडे असलेल्या रेकॉर्डवरुन माहिती दिली होती. नगररचना विभागाकडे पैसे जमा होतात. खर्च बांधकाम विभागाकडुन होतो.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे:- भुसंपादनासाठी वेगळे हेड तयार करावे लागेल यासाठी नगररचना विभागाने तसा प्रस्ताव मंजुर करुन आमच्याकडे पाठवावा. आज मितीस विकास भार हेडवर १५ कोटी शिल्लक नाहीत. ६ कोटी ८६ लाख जमा झालेले आहे.

मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.पवार:- वेगवेगळे हेड तयार करावे लागेल. त्यानुसार पुढे जमा होणा-या रक्कमा त्यामध्ये टाकाव्या लागेल.

मा.श्री.संपत बारस्कर:- बांधकाम परवानगी देतांना झाडे लावणे बंधनकारक केले जाते. परंतु प्रत्येक्षात पहाणी केली आहे का? संबंधितांनी झाडे लावली नसतील तर त्यांना दंड आकारणी करा. पाईपलाईन रस्त्यावर शॉपिंग कॉम्पलेक्स आरक्षण आहे का? मेन रोडला शॉपिंग कॉम्पलेक्स होते. ते मेन रस्त्यावरुन शिप्ट करुन ओढ्याच्या बाजुला टाकले. ओढे नाल्यामध्ये बांधकाम परवानगी दिलेल्या आहेत.

शहरामध्ये नविन पाईपलाईन टाकणे, पाईपलाईन दुरुस्ती करणे, वॉल बदलने इत्यादी कामे मोठ्याप्रमाणावर असतात.

मा.सभापती साहेब:- शहरात लाईन टाकणे याकरीता १.५० कोटी करा. वाढ़ीव हद्दीत लाईन टाकणे ३ कोटी करा. लाईन दुरुस्ती करीता २ कोटी तरतुद करा. टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे या लेखाशिर्षकात रक्कम रु.२ कोटीची वाढ़ करण्यात यावी.

मा.श्री.विनीत पाउलबुधे:- पाणी लाईन दुरुस्ती बाबतचे २५ लाखाची बिले देणे आहेत. ते तातडीने द्या. नाहीतर ठेकेदार काम करीत नाहीत.

मा.सभापती साहेब:- अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारित अर्थ संकल्पामध्ये "टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणे" या लेखाशिर्षकात बीले अदा करण्याकरीता तरतुद संपल्याने रक्कम रु.१ कोटी २५ लाखाची तरतुद

करण्यात यावी. तसेच "दलितेतर वस्ती सुधारणा योजना" या लेखाशिर्षकात रक्कम रु.२ कोटीची तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.संपत बारस्कर:- सांस्कृतीक कार्यक्रमाकरीता बजेट हेड वाढविण्यात यावे.

मा.सभापती साहेब:- नवीन मुतारी बांधने या हेडवर मागील प्रमाणे तरतुद ठेवा. सामाजिक संस्थांना देणगी देणे, सांस्कृतीक कार्यक्रम करणे, इत्यादी कामाकरीता भरीव तरतुद करणे आवश्यक आहे. रसिकग्रुप अहमदनगर सांस्कृतिक महोत्सावाकरिता रक्कम रु.७ लाख, नगरजल्लोष या कार्याक्रमाकरीता रक्कम रूपये १ लाख ५० हजार रूपये व पटवर्धन चौक प्रतिष्ठाण (ट्रस्ट) अहमदनगर रक्कम रु.१ लाख ५० हजार देण्यात यावी. या लेखाशिर्ष अंतर्गत रक्कम रूपये १० लाख दर्शविण्यात यावी.

मा.सभापती साहेब:- अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे. मा.महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२३-२४ या अंदाजपत्रकीय बैठकीसाठी मा.आयुक्त साहेब, मा.अतिरिक्त आयुक्त साहेब, मा.उपायुक्त (सामान्य) व (कर), मा.मुख्यलेखापरिक्षक, सर्व विभाग प्रमुख, यांनी मेहनत घेतली आहे. खासकरुन अहमदनगर महानगरपालिकेचे कर्त्यव्य दक्ष अधिकारी मा.मुख्यलेखाधिकारी श्री.शैलेश हिंदुराव मोरे साहेब यांचे विशेष आभार मानतो. मा.स्थायी समितीचे सदस्यांनी व अधिका-यांनी काही तरतुदी आपण सुचविल्या बद्दल, मा.स्थायी समितीच्या वतीने आपणासर्वाचे आभार मानतो. तसेच सर्व पत्रकार बंधू यांचे सुध्दा आभार मानतो व अर्थसंकल्पीय सभा संपल्याचे जाहीर करतो.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे (**सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये**) दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**तसेच**

*रिव्हीजन करणे करीता मे.स्थापत्य कन्सल्टंट प्रा.लिमिटेड, अमरावती या ठेकेदार संस्थेकडून रिव्हीजन पुर्ण झाल्यावर म.न.पा हद्दीमधील ज्या मालमत्ता धारकांना कर आकारणी झालेली नाही त्या सर्व मालमत्ता धारकांना कराची नव्याने आकारणी होणार असल्याने या करामध्ये वाढ होईल. "**सर्वसाधारण कर**" या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये ३ कोटी रूपयांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

*शहरातील इमारतींच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाकडील **"ना हरकत प्रमाणपत्र "** या लेखाशिर्षा मध्ये रू.२० लाखांनी वाढ करण्यात यावी.,

* चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स व भाजी मार्केट करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर बांधकाम करण्याचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा.

* सावेडी गांवठाण येथील महानगरपालिकेच्या शॉपींग सेंटर (एन.सी.सी.कार्या .) या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

* "**अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे** "या लेखाशिर्षा मध्ये मागील तीन वर्षा मधील उत्पन्न पहाता या रू.२ कोटी ने वाढ सुचविण्यात येत आहे.

*"**नळधारकाकडून जमा पाणीपट्टी**" या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये १ कोटी २ लाखाने वाढ करण्यात यावी.

*"**मालमत्ता नांव नोंदणी फि** " या लेखाशिर्षा मध्ये नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून होणार आसल्याने रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

* **"जाहिरात बोर्ड जागा भाडे "** या लेखाशिर्षाअंतर्गत जाहिरात बोर्ड बाबत राज्यसरकारने केलेल्या नियमांची अंमलबजावणी करून आकारणी दराची नियमावली लागु झाल्यानंतर या उत्पन्नमध्ये वाढ होणार असलयाने या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये ५० लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

*अहमदनगर शहरामध्ये हरित क्रांती होणे कामी वृक्षकरातुन जमा होणारी रक्कम लागवड व संवर्धन करणेकरीता येणा-या खर्चाची बीले त्यातुनच अदा करावे. इतर कामी करीता वृक्ष कराचे पैसे वापरता येणार नाहीत याबाबत दक्षता घ्यावी. वृक्षकरा पोटी जमा होणा-या रक्कमेकरीता स्वतंत्र बॅक खाते उघडुन यामध्ये वृक्षकराची रक्कम जमा करण्यात यावी.

*नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिग होम ॲक्ट अंतर्गत फि पासून मिळणा-या

उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रु. १५ लाख वाढ करण्यात यावी.

*नोंदणी कृत हॉस्पीटला बांधकाम परवानगी व FSI नुसार मनपा हद्दीतील गरीब रुग्नासाठी उपचाराकरीता १०% बेड राखीव ठेवणे बंधनकारक आहे. त्यानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी याबाबतची अमलबजावणी करण्यात यावी.

*अहमदनगर शहर हद्दीमध्ये विविध ठिकाणी वाहन पार्किंग करता जागा उपलब्धतेनुसार पॉलिसी बनविण्यात यावी. ठेकेदार संस्थाची नेमणुक करुन वाहन पार्किंगची वसुल करण्यात यावी. काही भागात सम विषम तारखेनुसार पार्किंग करण्यात यावी.

*भुसंपादनासाठी नविन लेखाशिर्षक निर्माण करण्यात यावे. याकरिता स्वतंत्र बॅक खाते उघडण्यात यावे.

*अमृत २.०/नगरोत्थान योजना अनुदान-नविन लेखाशिर्षक निर्माण करुन रक्कम रु.१०० कोटी तरतुद दर्शविण्यात यावी.

*अमृत २.०/नगरोत्थान योजना मनपा हिस्सा नविन लेखाशिर्षक निर्माण करुन रक्कम रु.३० कोटी तरतुद दर्शविण्यात यावी.

*सिटी सर्व्हे. सावेडी गावठाण या लेखाशिर्षामध्ये शहर हद्दीतील सर्व उपनगराचा सिटी सर्व्हे होणेकरीता/ सिटी सर्व्हे. सावेडी गावठाण उपनगरासह असा नावात बदल करण्यात यावा.

***"सामाजिक संस्थांना देणगी"** या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १० लाख तरतूद दर्शविण्यात यावी. रसिक ग्रुप अहमदनगर सांस्कृतिक महोत्सावाकरिता रक्कम रु.४ लाख, नगरजल्लोष या कार्याक्रमाकरीता रक्कम रूपये १ लाख ५० हजार रूपये व पटर्वधन चौक प्रतिष्ठाण (ट्रस्ट) अहमदनगर रक्कम रु.१ लाख ५० हजार देण्यात यावी. याबाबत संबंधीत संस्थाकडून कागदपत्राची पुर्तता करून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदरचा खर्च **सामाजिक संस्थांना देणगी** या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.

*महानगरपालिका सर्व कार्यालये व महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारती रेन वॉटर हारवेस्टींग करणेकरीता रक्कम रु.१० लाख तरतुद जलशक्ती अभियान राबविणे या अंतर्गत करण्यात यावी.

*म.न.पा.हद्दीमध्ये गॅस कंपनी मार्फत घरगुती गॅस पाईप लाईन टाकण्याचे काम लवकरच सुरू होणार असल्याने तसेच केबल टाकणे, पाण्याची लाईन टाकणे व दुरूस्त करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करता रस्ता फोडणे करिता शुल्क आकारले जाते त्यामुळे**" रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर"** या लेखाशिर्षा मध्ये रूपये ५ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.

*मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता **"अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम "**या लेखाशिर्षा मध्ये रू.२ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

***"विकास भार निधीतुन खर्च "** या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटी ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

***" बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा"** या लेखाशिर्षा मध्ये रू. ४७ लाख रूपयांनी वाढ करावी.

*"**रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक)"** या लेखाशिर्षामध्ये रू.५० लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

*हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनावर बसलेला ब्रांझ धातुचा पुतळा तयार करून महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील जागेत नियोजित चबुत-यावर बसविणे बाबतची निविदा मा.स्थायी समिती मध्ये निविदा मंजूर झालेली असून श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयाचे बॅकराउंड या कामा करीता रक्कम रूपये १ कोटी वाढ **"पुतळे बसविणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.एकुण रक्कम रू.३ कोटी ५० लक्ष दर्शविण्यात यावी.तसेच राष्ट्रपुरूष महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा माळीवाडा वेशीमध्ये बसविण्यात यावा. महापुरूष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा मार्केट यार्ड चौकामध्ये बसविण्यात यावा,छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा सावेडी भागातील प्रोफेसर चौक येथे बसविण्यात यावा या कामा करीता येणारा खर्च **"पुतळे बसविणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

*शहर व उपनगररामध्ये **"नविन इलेक्ट्रीक पोल बसविणे"** या लेखाशिर्षा अंतर्गत २५ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

*अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम हाती घेवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. **"अनाधिकृत नळ निमानुकुल करणे "**या बाबत योजना जाहिर करण्यात यावी.यास्तव या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटी २ लाखाची वाढ करण्यात यावी.

***"नविन गटर"** या लेखाशिर्षका अंतर्गत तरतुदीमध्ये रक्कम रु.५० लाखाने कपात करण्यात यावी.

***"वॉर्ड विकास निधी"** या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रू.२ कोटी ३२ लाख तरतुद करण्यात यावी. मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी या लेखाशिर्ष अंतर्गत प्रशासनाने केलेली तरतुद अत्यल्प असल्याने मा.नगरसेवकांना आपल्या प्रभागामध्ये तातडीचे कामे करावी लागतात एकुण नगरसेवकांची संख्या विचारात घेता प्रत्येक नगरसेवकांस मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी व "वॉर्ड विकास निधी" असे एकत्रित रू.१५ लाख प्रमाणे , कामे सुचविता येतील.

***मा.महापौर शहर विकास निधी** रू.२ कोटी ५० लाख, **"मा.उपमहापौर शहर विकास निधी "**रू.१ कोटी ५०लाख, **"मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी"** रू.५० लाखची तरतुद दर्शविण्यात यावी.

**मा.सभापती,महिला व बाल विकास निधी** रू.१५ लाख दर्शविण्यात यावी. **मा.उप सभापती,महिला व बाल विकास निधी** रू.१० लाख दर्शविण्यात यावी. **मा.सभागृह नेता शहर विकास निधी** रू.५० लाख दर्शविण्यात यावी. **मा.विरोधी पक्षनेता शहर विकास निधी** रू.५० लाख दर्शविण्यात यावी

* प्रभाग क्र.१३ नालेगाव भागातील नानापाटील वस्ताद तालीम बांधणे व याकरीता जिम साहित्य खरेदी करणे या कामा करीता रू.४० लक्ष खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "**या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

***"वाढीव हद्दीतील पाईपलाईन टाकणे"** या लेखाशिर्षामध्ये रू.७० लाख वाढ करण्यात यावी.

***"शहरी भागात पाईपलाईन टाकणे"** या लेखाशिर्षामध्ये रू.७० लाख वाढ करण्यात यावी.

***सौ.पुष्पाताई अनिल बोरुडे, सभापती महिला व बालकल्याण समिती** यांचे प्राप्त पत्रानुसार मा.शासन निर्णयानुसार महिला व बालकल्याण समिती करीता एकुण अंदाजपत्रकाच्या ५% नियमानुसार करण्यात आलेली तरतुद रोख स्वरुपात करण्यात यावी.

*मा.केंद्र शासन व मा.राज्य शासन यांच्या मार्गदर्शनानुसार स्वच्छता अभियान राबविण्यात येते. शहर स्वच्छ होणेकामी घनकचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत अहमदनगर शहरातील चार प्रभाग समिती यांना प्रत्येकी एक **"गारबेज पिकर मशिन"** चार नग उपलब्ध करुन देण्यात याव्या. याकामी येणारा अंदाजे रक्कम रु.८० लक्ष खर्च १५ व्या वित्त आयोग (घनकचरा व्यवस्थापन) मधुन भागविण्यात यावा.

*महानगरपालिकेच्या मालकीचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी सुसज्य ग्रंथालय उभारावे व स्मारकाची देखभाल दुरूस्ती सदरचा खर्च **"इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षा"** अंतर्गत करण्यात यावा. या कामा करीता रक्कम रूपये २५ लाखांची तरतुद मध्ये वाढ करण्यात यावी.

*पाणी पुरवठा साहित्य (खरेदी व रिपेअर) या कामा करीता रक्कम रूपये १ कोटींची तरतुद मध्ये वाढ करण्यात यावी.

*"**टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे**" या लेखाशिर्षकात रक्कम रु.२ कोटीची वाढ करण्यात यावी.

* शहरातील प्रमुख चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने खाजगी संस्था,सामाजिक संस्था,यांचे मार्फत  कार्यवाही करण्यात यावी तसेच शहरातील प्रमुख रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे देखील आवश्यक असून त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल या करिता डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था,कंपनी,सामाजिक संस्था यांना या कामी प्रवृत्त करण्यात यावे व त्यांचे मार्फत सुशोभिकरणास परवानगी देण्यात यावी.

**अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारित अर्थ संकल्पामध्ये**

*"**टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणे**" या लेखाशिर्षकात बीले अदा करण्याकरीता तरतुद संपल्याने रक्कम रु.१ कोटी २५ लाखाची तरतुद करण्यात यावी.

*"**दलितेतर वस्ती सुधारणा योजना**" या लेखाशिर्षकात रक्कम रु.२ कोटीची तरतुद करण्यात यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम  १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२२-२०२३ चे सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सन २०२३-२०२४ अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ सालचे बाबवार अंदाजपत्रकास मान्यता व शिफारशी सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. विनीत पाउलबुधे:- सही/-

अनुमोदक :- मा.श्री.प्रदीप परदेशी:- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबतः- सन २०२२-२०२३ चे सुधारित व सन २०२३-२०२४ सालचे मुळ अंदाज पत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

| अहमदनगर महानागरपालिका अहमदनगर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा.स्थायी समितीने शिफारस केलेला सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात) | | | | | |
| | | | | | |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०२३)........................................ ...३५२.१८ | | | | | |
| एकुण जमा.................................................................... १३८४२७.३७ | | | | | |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा.............................................. १३८७७९.५५ | | | | | |
| एकुण खर्च........................................................................ १३८४६६.१४ | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२४)..................................... ३१३.४१ | | | | | |
| अ. नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू) सन २०२२-२३** | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ५१२२.७० | १६५.०० | | ५२८७.७० |
| १ | ना हरकत प्रमाणपत्र (अग्निशमन) | ४.०० | २०.०० | | २४.०० |
| २ | अनाधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | १५०.०० | २००.०० | | ३५०.०० |
| ३ | मालमत्ता नांव नोदणी फी | ४२४.०० | ५०.०० | | ४७४.०० |
| ४ | जाहिरात बोर्ड जागा भाडे | १०.०० | ५०.०० | | ६०.०० |
| ५ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईपासुन उत्पन्न | १०.०० | ५०.०० | | ६०.०० |
| ६ | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | ८००.०० | १००.०० | | ९००.०० |
| ७ | विकास भार निधी | ७००.०० | १५०.०० | | ८५०.०० |
| ८ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | ३.०० | १०.०० | | १३.०० |
| ९ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक) | ४०.०० | १००.०० | | १४०.०० |
| १० | अनाधिकृत नळ नियमानुकूल करणे | २२०.०० | १००.०० | | ३२०.०० |
| ११ | पाणी विक्री जमा | २५.०० | ५०.०० | | ७५.०० |
| १२ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | २६४०.०० | २००.०० | | २८४०.०० |
| १३ | रस्ते फोडणे,जोडणे वसुली व बांधकाम इतर | ११००.०० | ३००.०० | | १४००.०० |
| | एकुण | ११२४८.७० | १५४५.०० | ०.०० | १२७९३.७० |

अहमदनगर महानागरपालिका अहमदनगर

मा.स्थायी समितीने शिफारस केलेला सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)

सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०२३)........................................ ...३५२.१८

एकुण जमा.................................................................... १३८४२७.३७

सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................ १३८७७९.५५

एकुण खर्च.................................................................... १३८४६६.१४

अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२४)..................................... ३१३.४१

| अ. नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२३-२४** | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | नविन रस्ते विकसीत करणे | १५००.०० | ४५.०० | | १५४५.०० |
| २ | नविन वाहन खरेदी (अग्निशमन विभाग) | ८०.०० | ५०.०० | | १३०.०० |
| ३ | पुतळे बसविणे | १६०.०० | १५०.०० | | ३१०.०० |
| ४ | सामाजिक संस्थांना देणगी | ०.०० | ५.०० | | ५.०० |
| ५ | अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | ८००.०० | १००.०० | | ९००.०० |
| ६ | विकास भार निधी | १७५.०० | ३७.५० | | २१२.५० |
| ७ | विकास भार निधी (नगररचना भू संपादन) | ५२५.०० | ११२.५० | | ६३७.५० |
| ८ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | ३.०० | १०.०० | | १३.०० |
| ९ | रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक) | ४०.०० | १००.०० | | १४०.०० |
| १० | विकास योजना GIS Based सुधारीत करणे (अमृत १५ वा वित्त आयोग /विकास भार किंवा वैशिष्टपुर्ण इ.योजना) | ५००.०० | २००.०० | | ७००.०० |
| ११ | वाढीव हद्दीत पाईपलाईन टाकणे | ३०.०० | ७०.०० | | १००.०० |
| १२ | पुतळे देखभाल | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| १३ | नविन इले.पोल व स्पॅन फिटींग | ५०.०० | २५.०० | | ७५.०० |
| **१४** | ब्लड डोनर व्हॅन खरेदी | ०.०० | ४०.०० | | ४०.०० |
| **१५** | महापौर शहर विकास निधी | ०.०० | २५०.०० | | २५०.०० |
| **१६** | उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | १५०.०० | | १५०.०० |
| **१७** | सभापती स्थायी समिती शहर विकास निधी | ०.०० | १००.०० | | १००.०० |
| **१८** | महापौर चषक स्पर्धा | १५.०० | ५.०० | | २०.०० |
| **१९** | क्रीडांगणे विकसीत करणे | १.०० | ५.०० | | ६.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | नविन संकणक ,संगणक साहित्य,हार्डवेअर,सॉफ्टवेअर खरेदी(सर्व विभाग)/ई -गव्हर्नन्स | २५.०० | ४०.०० | | ६५.०० |
| २१ | इमारत दुरूस्ती | ५०.०० | २५.०० | | ७५.०० |
| | एकुण | ३९५४.०० | १५४५.०० | ०.०० | ५४९९.०० |

सही /-
सभापती, स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

| अहमदनगर महानागरपालिका अहमदनगर |
|---|
| मा.स्थायी समितीने शिफारस केलेला सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात) |
| |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०२२).......................................३५८.७७ |
| एकुण जमा.................................................................. ८७४२८.९५ |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................ ८७७८७.७२ |
| एकुण खर्च.................................................................. ८७४३५.५४ |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२३).................................. ३५२.१८ |

| अ. नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू) सन २०२२-२३** | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करणे | ८०.०० | १२५.०० | | २०५.०० |
| २ | दलितेतर वस्ती सुधारणा | ११११.०० | २००.०० | | १३११.०० |
| | एकुण | ११११.०० | ३२५.०० | ०.०० | १३११.०० |

| अ. नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२२-२३** | मा.आयुक्त यांनी केलेली तरतुद | मा.स्थायी समितीने केलेला बदल | | मा.स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | दलितेतर वस्ती सुधारणा | ११११.०० | २००.०० | | १३११.०० |
| २ | टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे | २००.०० | १२५.०० | | ३२५.०० |
| | एकुण | १३११.०० | ३२५.०० | ०.०० | १६३६.०० |

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका